# १७. दिनदर्शिका




**दिनू** : मित्रांनो! ऑगस्ट महिन्यात आपला स्वातंत्र्य दिन साजरा झाला. शाळेत झेंडावंदन झाले, प्रभातफेरी निघाली, भाषणे झाली, मुलांना खाऊ दिला. आता २६ जानेवारीला आपल्या शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा होईल.

**रहीम** : दिनू , तुला कसे रे कळते, कोणत्या दिवशी काय साजरे होणार आहे? कोणत्या दिवशी सुट्टी आहे?

**दिनू** : त्यात काय एवढे! अरे, घरी दिनदर्शिका असते ना. त्यात सर्व माहिती दिलेली असते.

**मुमताज** : काय काय माहिती असते दिनदर्शिकेत?

**दिनू** : दिनदर्शिकेत वर्ष, महिने, वार आणि दिनांक दिलेले असतात.

**रंजना** : आणखी काय बरे असते?

**दिनू** : विविध सण, उत्सव दिलेले असतात. थोर व्यक्तींची जयंती, पुण्यतिथी असे दिनविशेष दिलेले असतात.

**हेमांगी** : दिनू, तुला तर फारच माहिती आहे रे!

**दिनू** : हो, मी रोज सकाळी दिनदर्शिका वाचतो, मगच शाळेत येतो. त्यामुळे परिपाठात मला माहिती सांगता येते.

**अर्चना** : चला मित्रांनो, आपण वर्गातील दिनदर्शिका समजून घेऊया.

## वर्गकार्य

- दिनदर्शिका पाहा, वाच आणि उत्तरे पाटीवर लिही.

(अ) ऑगस्ट महिन्याचे एकूण दिवस

(आ) ऑगस्ट महिन्यात आलेले एकूण रविवार












(इ) ऑगस्ट महिन्यात पाच वेळा आलेले वार

(ई) ऑगस्ट महिन्यात आलेले सण

(उ) पौर्णिमा असलेला दिनांक व वार

(ऊ) अमावस्या असलेला दिनांक व वार

- इंग्रजी, मराठी महिने शोध व पाटीवर लिही.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जा |  | मा | र्च | श्रा | पौ | ष |  |
| ने | ए | प्रि | ल | व |  |  | नो |
| वा | डि | फे |  | ण |  | ऑ | व्हें |
| री | सें | ब्रु | का | भा | ऑ | क्टो | ब |
|  | ब | वा | र्ति | द्र | ग | ब | र |
| चै | र | री | क | प | स्ट | र |  |
| त्र |  |  |  | द |  |  |  |
|  | जू | वै | शा | ख | आ | श्वि | न |
| ज्ये | न |  | मा | घ | षा |  |  |
| ष्ठ |  | जु | लै |  | ढ |  | मे |
|  | स | प्टें | ब | र |  |  |  |
| मा | र्ग | शी | र्ष |  | फा | ल्गु | न |

- तुला आवडणाऱ्या पक्षी व प्राण्यांच्या चित्रांना गोल कर.
- पुढील महिन्यातील एका आठवड्यात काय काय करशील ते दिनदर्शिका पाहून सांग.

CW9EDK